जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
2 2 AUG 2025

पुण्यनगरी

# शिवाजी विद्यापीठात सद्भावना दिन शपथ

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठात शांती व अहिंसा यांची शपथ घेत सद्भावना दिन साजरा करण्यात आला. माजी पंतप्रधान राजीव गांधी यांच्या जयंतीनिमित्त कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांच्या उपस्थितीत तंत्रज्ञान अधिविभागाचे डॉ. अरविंद मडावी यांनी सर्व उपस्थितांना सद्भावना शपथ दिली. यावेळी क्रीडा संचालक डॉ. शरद बनसोडे, डॉ. प्रशांत पाटील यांच्यासह शिक्षक, प्रशासकीय सेवक, राष्ट्रीय छात्रसेनेचे विद्यार्थी, विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
22 AUG 2025
सकाळ

# जी. डी. बापू लाड अध्यासनास सोमवारी प्रारंभ

कोल्हापूर, ता. २१ : शिवाजी विद्यापीठातील डॉ. जी. डी. (बापू) लाड अध्यासनास सोमवारपासून (ता. २५) सुरुवात होत आहे. त्यानिमित्त विशेष व्याख्यान व शाहिरी होणार आहे. राजर्षी शाहू सभागृहात सकाळी साडेअकरा वाजता त्यास सुरुवात होईल. स्वातंत्र्यलढ्यातील थोर स्वातंत्र्यसेनानी व समाजसुधारक क्रांतिअग्रणी डॉ. जी. डी. (बापू) लाड यांच्या नावाने विद्यापीठात अध्यासन सुरू होत आहे. ज्येष्ठ पत्रकार उत्तम कांबळे यांचे 'भारतीय स्वातंत्र्यलढा आणि जी. डी. (बापू) लाड' या विषयावर व्याख्यान होणार असून, शाहीर सदाशिव निकम यांच्या शाहिरीचा कार्यक्रम होईल.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
22 AUG 2025
पुण्यनगरी

# स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्रासाठी प्रवेश सुरू

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठ स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्रात २०२५-२६ या शैक्षणिक वर्षासाठी प्रवेश प्रक्रिया सुरू केली आहे. विद्यापीठ अनुदान आयोग, यूजीसी नवी दिल्ली योजनेंतर्गत एससी, एसटी, ओबीसी, ईडब्ल्यूएस (नॉन क्रिमिलेयर) व अल्पसंख्याक (मुस्लिम, ख्रिश्चन, शीख, बौद्ध, आणि जैन) आणि खुल्या गटातील विद्यार्थ्यांकरिता प्रवेश परीक्षा अर्ज ऑफलाईन पद्धतीने मागवले आहेत. हे प्रवेश अर्ज दि. २१ ते दि. ३० ऑगस्टपर्यंत आवश्यक कागदपत्रांसहित केंद्राच्या कार्यालयात सकाळी १०.३० ते सायंकाळी ६ पर्यंत जमा करावेत. प्रवेश परीक्षा दि. ९ सप्टेंबर रोजी सायंकाळी ४ ते ५.३० या वेळेत ऑफलाईन पद्धतीने स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र, मानव्यशास्त्र इमारत येथे घेण्यात येईल, अशी माहिती केंद्राचे संचालक डॉ. प्रकाश कांबळे यांनी दिली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
22 AUG 2025
पुढारी

# राष्ट्रपती पदकासाठी ३१ ऑगस्टपर्यंत अर्ज करण्याचे विद्यापीठातर्फे आवाहन

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या वतीने देण्यात येणाऱ्या राष्ट्रपती पदकासाठी पात्र विद्यार्थ्यांनी ३१ ऑगस्टपर्यंत अर्ज करावेत, असे आवाहन शिवाजी विद्यापीठाच्या वतीने करण्यात आले आहे. शिवाजी विद्यापीठाच्या पदव्युत्तर प्रवेश विभागातर्फे हुशार व गुणी विद्यार्थ्यांकरिता विविध पारितोषिके जाहीर करण्यात येतात. १९९४-९५ पासून 'दि प्रेसिडेंट ऑफ इंडिया मेडल फॉर जनरल प्रोफिशियन्सी, शिवाजी युनिव्हर्सिटी' हे पारितोषिक विद्यापीठाच्या दीक्षांत समारंभात प्रदान करण्यात येते. २०२४-२५ या शैक्षणिक वर्षासाठी या पारितोषिकासाठी पात्र विद्यार्थ्यांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत. दि. ३१ ऑगस्टपर्यंत अंतिम मुदत देण्यात आली आहे. अधिक माहितीसाठी पदव्युत्तर प्रवेश विभागाशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
2 2 AUG 2025
पुढारी

# पूरस्थितीमुळे विद्यापीठाच्या नियोजित परीक्षा पुढे ढकलल्या



**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठ अंतर्गत बी.टेक अभ्यासक्रमाची पुनर्परीक्षा सुरू होती. परंतु, गेल्या पाच दिवसांपासून मुसळधार पावसामुळे काही भागांत पूरस्थिती निर्माण झाली आहे. तसेच काही गावांचे रस्तेही बंद करण्यात आले आहेत. त्यामुळे शिवाजी विद्यापीठ प्रशासनाने बी.टेक अभ्यासक्रमाच्या दोन विषयांचे पेपर पुढे ढकलले आहेत.

कोल्हापूर जिल्ह्यात गेल्या पाच दिवसांपासून मुसळधार पाऊस सुरू आहे. त्यामुळे जिल्ह्यातील अनेक गावांमध्ये पूरस्थिती निर्माण झाली आहे. त्यामुळे बी.टेक अभ्यासक्रमाच्या सुरू असलेल्या पुनर्परीक्षेचे गुरुवार, २१ ऑगस्ट आणि शुक्रवार, २२ ऑगस्ट रोजी होणारे दोन पेपर पुढे ढकलले आहेत. गडहिंग्लजमधील ए. डी. शिंदे कॉलेज व म्हागाव येथील बी.टेक कॉलेज परिसरात पावसाने रस्ते बंद झाले आहेत. त्यामुळे विद्यार्थी हित लक्षात घेऊन शिवाजी विद्यापीठाने हा निर्णय घेतला आहे. २१ ऑगस्टचा पेपर ४ सप्टेंबरला आणि २२ ऑगस्टचा पेपर ८ सप्टेंबरला घेतला जाणार आहे, अशी माहिती शिवाजी विद्यापीठ प्रशासनाने दिली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
22 AUG 2025
पुढारी

# विद्यापीठाच्या स्पर्धा परीक्षा केंद्रात प्रवेशाची संधी; अर्ज ३० ऑगस्टपर्यंत; ९ सप्टेंबरला प्रवेश परीक्षा

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्रामार्फत शैक्षणिक वर्ष २०२५-२६ साठी प्रवेश प्रक्रिया सुरू झाली आहे. नवी दिल्ली येथील विद्यापीठ अनुदान आयोग (यूजीसी) यांच्या योजनेंतर्गत एससी, एसटी, ओबीसी, ईडब्ल्यूएस (नॉन-क्रिमीलेयर), तसेच अल्पसंख्याक समुदायांतील (मुस्लिम, ख्रिश्चन, शीख, बौद्ध, जैन) आणि खुल्या गटातील विद्यार्थ्यांकडून प्रवेश अर्ज मागविण्यात येत आहेत. प्रवेशासाठी अर्ज शिवाजी विद्यापीठाच्या संकेतस्थळावर (www.unishivaji.ac.in) उपलब्ध आहेत. तसेच अर्ज केंद्राच्या कार्यालयातूनही घेता येतील. प्रवेशासाठी अर्ज सादर करण्याची अंतिम मुदत ३० ऑगस्ट २०२५ असून, अर्ज आवश्यक कागदपत्रांसह केंद्राच्या कार्यालयात २१ ते ३० ऑगस्ट या कालावधीत सकाळी साडेदहा ते सायंकाळ सहा या वेळेत जमा करता येतील. स्पर्धा परीक्षेसाठीची प्रवेश परीक्षा ९ सप्टेंबर रोजी सायंकाळी ४ ते साडेपाच या वेळेत ऑफलाईन पद्धतीने मानवी शास्त्र इमारतीतील स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्रात घेण्यात येणार आहे, अशी माहिती केंद्राचे संचालक डॉ. प्रकाश कांबळे यांनी दिली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
22 AUG 2025
लोकमत

# दीक्षांत समारंभासाठी ४६ हजार अर्ज

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाच्या ६२ व्या दीक्षांत समारंभात पदवी प्रमाणपत्र घेण्यासाठी अर्ज भरण्याची प्रक्रिया सुरू आहे. आत्तापर्यंत ४६ हजार विद्यार्थ्यांनी पदवी प्रमाणपत्रासाठी अर्ज भरले आहेत. तर ३१ ऑगस्टपर्यंत विद्यार्थ्यांना नियमित शुल्कासह अर्ज भरता येणार आहेत. दीक्षांत समारंभ डिसेंबर महिन्यात घेण्याचे विद्यापीठ प्रशासनाचे नियोजन आहे.

शिवाजी विद्यापीठाचा दीक्षांत समारंभ घेण्यासाठी राज्यपालांची परवानगी घ्यावी लागते. सध्याचे राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी उपराष्ट्रपती पदासाठी अर्ज भरला आहे. त्यामुळे नूतन राज्यपालांची नियुक्ती झाल्यानंतर त्यांच्या सोयीनुसार शिवाजी विद्यापीठाचा दीक्षांत समारंभ घेतला जाणार आहे. तरीही डिसेंबर महिन्यात दीक्षांत समारंभ घेण्यासाठी शिवाजी विद्यापीठाकडून प्रयत्न सुरू आहेत. सध्या दीक्षांत समारंभात पदवी प्रमाणपत्रासाठी अर्ज भरण्याची प्रक्रिया सुरू आहे. विद्यार्थ्यांना ३१ ऑगस्टपर्यंत नियमित शुल्कासह अर्ज भरता येणार आहे. परीक्षा विभागाकडून व्दिभाषिक पदवी प्रमाणपत्र देण्याची तयारी पूर्ण झाली आहे. शिवाजी विद्यापीठात त्यादृष्टीने बैठकांचा सिलसिला सुरू असून विद्यापीठ प्रशासन दीक्षांत समारंभासाठी सज्ज झाले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
2 2 AUG 2025

सकाळ

# भूगोल अभ्यासक्रमातील बदलांवर कार्यशाळा

**कोल्हापूर :** राजर्षी छत्रपती शाहू कॉलेजमध्ये भूगोल अभ्यासक्रमातील बदलावर कार्यशाळा झाली. नव्या शैक्षणिक धोरणातील बी. ए. भाग दोनच्या भूगोल या विषयाच्या बदललेल्या अभ्यासक्रमाची खुली निवड, कौशल्यवर्धित कोर्स, व्यावसायिक कौशल्य अभ्यासक्रमाची माहिती दिली. शिवाजी विद्यापीठातील मानव्यशास्त्र विभागाचे अधिष्ठाता प्रा. डॉ. एम. एस. देशमुख यांनी उद्घाटन केले. भूगोल अभ्यास मंडळाचे अध्यक्ष डॉ. बी. एस. जाधव यांनी माहिती दिली. अध्यक्षस्थानी प्रभारी प्राचार्य प्रा. डॉ. डी. आर. भोसले होते. कार्यशाळेच्या समारोपास विवेकानंद महाविद्यालयच्या भूगोल विभागाचे माजी विभागप्रमुख प्रा. डॉ. एच. पी. पाटील, डॉ. एम. ए. पाटील, डॉ. सचिन हुदले, डॉ. टी. पी. शिंदे यांनी मार्गदर्शन केले. कार्यशाळेसाठी डॉ. जे. एम. पालकर, डॉ. बी. बी. घुरके, डॉ. ए. एच. पाटील, प्रा. आर. वाय. कांबळे, डॉ. के. एन. मुल्ला यांनी परिश्रम घेतले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
2 2 AUG 2025
लोकमत

# पावसामुळे बी. टेकचे पेपर ढकलले पुढे

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठ अंतर्गत बी. टेक अभ्यासक्रमाची पुनर्परीक्षा सुरू होती. परंतु कोल्हापूर जिल्ह्यासह सांगली व सातारा जिल्ह्यात मुसळधार पावसामुळे काही भागात पूर परस्थिती निर्माण झाली आहे. काही गावांचे रस्तेही बंद करण्यात आले आहेत. त्यामुळे शिवाजी विद्यापीठ प्रशासनाने बी. टेक अभ्यासक्रमाच्या दोन विषयांचे पेपर पुढे ढकलले आहेत. २१ ऑगस्टचा पेपर ४ सप्टेंबरला आणि २२ ऑगस्टचा पेपर ८ ऑगस्टला घेतला जाणार आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
2 2 AUG 2025

पुण्यनगरी

# शिवराज महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांचे यश

**गडहिंग्लज :** शिवाजी विद्यापीठाच्या गुणवत्ता यादीत येथील शिवराज महाविद्यालयाच्या बी.एस्सी. केमिस्ट्रीमध्ये रिचा पाटील ९५.३३ टक्के गुण घेऊन प्रथम, रिया पाटील हिने ९५ टक्के गुण मिळवून द्वितीय, तर पदव्युत्तर विभागाच्या अक्षता रजपूत हिने एम. ए. हिंदीमध्ये ७३.९१ टक्के गुण मिळवून पाचवा क्रमांक, एम. कॉम. परीक्षेत धनश्री कुंभार ७३.७७ टक्के व वैशाली साबळे ७३.५० टक्के गुण मिळवून अनुक्रमे आठवा व नववा क्रमांक पटकावला. त्यांचे महाविद्यालयाच्या वतीने अभिनंदन करण्यात आले.